N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

**1. District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** गाडगे नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0588 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/08/2025 01:34

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 31/07/2025
**Date To (दिनांक पर्यंत):** 31/07/2025
**Time From (वेळेपासून):** 13:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:08 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/08/2025 **Time (वेळ):** 01:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/08/2025 01:34 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** **Beat No. (बिट क्र.):**

पूर्व, 2 किमी

**(b) Address (पत्ता):** उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय,अमरावती

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): ड. गजानन गुलाबराव बुल

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1950

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवजिवन कलनी ,महापौर बंगल्यासमोर,अमरावती ,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नवजिवन कलनी ,महापौर बंगल्यासमोर,अमरावती ,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7588545661

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल पांडुरंग नेमाडे | | | 1. नवसारी साई मंदीराजवळ , कल्पना नगर ,अमरावती , अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. चंद्रशेखर पुंडलिकराव गोळे | | | 1. सोनल कलनी ,शेगाव रहाटगाव रोड,अमरावती ,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पंचासमक्ष सदर 50,000/रु ची लाच रक्कम स्विकारली | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती दि 31/07/2025 माझे नाव- ॲड. गजानन गुलाबराव बुल वय 75 वर्ष,व्यवसाय -वकीली रा.नवजिवन कॉलनी,महापौर बंगल्यासमोर अमरावती मो.न.7588545661मी दि 10/07/2025रोजी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथे येवुन अपर पोलीस अधिक्षक यांच्या समक्ष पोलीस उपअधिक्षक श्री.किनगे सर यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती की,मी अर्जदार उपरोक्त विषयास अनुसरुन तक्रार अर्ज देत आहे की, माझा मुलगा नामे हेमेंद्र गजानन बुल याच्या नावाने घर क्र.623 नवजिवन कॉलनी अमरावती कॅम्प येथे आहे. माझा मुलगा हा विदेशात (कतार) येथे राहत असल्याने त्याच्या घराचा मुखत्यार मी आहे. भुमीअभिलेख कार्यालयाने गैरकायदेशीर पदधतीने घराचा फेरफार नलिनी सदावर्ती रा.अमरावती, त्यांच्या मुली व मुलाच्या नावाने केला.त्याला मी जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख अमरावती कार्यालयात आव्हान दिले.त्याचा निकाल माझे बाजुने दि 24/08/2022 ला लागला त्यानंतर पुन्हा विरूध्द पक्षाने उप संचालक भुमी अभिलेख अमरावती यांच्याकडे अपिल दाखल केली होती.त्याचाही निकाल माझे बाजुने दि 18/10/2024 रोजी लागला म्हणुन तो पुर्वीचा फेरफार रद्द करून माझा मुलगा नामे हेमेंद्र गजानन बुल याच्या नावाने फेरफार घेण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयात मी दि 20/01/2025 ला अर्ज दिला होता.मी दि 23/06/2025 रोजी संबधित कागदपत्रे घेवुन उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय अमरावती येथे गेलो असता फेरफार संबधिचे कामकाज चद्रशेखर गोळे पद नगर परीरक्षण भुमापक क्र.3 यांच्याकडे असल्याचे मला समजल्याने मी त्यांची भेट घेतली आणि माझे कडील आमच्या बाजुने लागलेल्या निकालाचे सर्व कागदपत्रे दाखविले व माझा मुलगा नामे हेमेंद्र गजानन बुल यांच्या नावाने फेरफार घेण्यात यावा याबाबत विनंती केली.त्यावर श्री.गोळे साहेबांनी मला म्हटले की,तुम्हाला 1,25,000/- रु दयावे लागेल तर तुमचे काम होते त्यावर मी नाईलाजाने त्यांना हो म्हटले. व सांगीतले की,माझी उदया दि 24/06/2025 रोजी सुनावनी आहे पण उदया मी सुनावनीसाठी हजर राहु शकत नाही तसा मी अर्ज ॲडव्होकेट मामर्डे मार्फत पाठवुन देईल असे सांगीतले व तेथुन निघुन गेलो. दि 27/06/2025 रोजी मला उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय अमरावती येथुन नोटीस आलेली आहे. दि 11/07/2025 रोजीची तारीख आहे. त्यामुळे मला उदया उपअधिक्षक कार्यालय अमरावती येथे जाणे आहे परंतु तेथे गेल्यावर श्री.गोळे हे मला पुन्हा पैशांची मागणी करतील मला श्री.गोळे यांना पैसे देण्याची मुळीच ईच्छा नाही. तसेच त्यांच्यासोबत माझा कोणताही देवाण घेवाण चा आर्थीक व्यवहार नाही. तसेच त्यांच्यासोबत कोणत्याही प्रकारचा वाद नाही तरी त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती. अशी लेखी तक्रार दिली होती. त्यांनतर पोलीस उपअधिक्षक साहेबांना मी सांगितले की,मी वयोवृदध आहे तसेच मी ज्या कार्यालयातील लोकसेवका बददल तक्रार देत आहे ते कार्यालय आपल्या कार्यालयासमोरच आहे त्यामुळे मी वारंवार आपल्या कार्यलयात आलो तर लोकसेवक याला संशय येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी आता तुमच्या कार्यालयात येवु शकत नाही तुम्ही तुमची टिम माझ्या घरी पाठवा अशी विनंती केली. मी दिलेंल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता पो.नि.श्रीमती योगीता ठाकरे मॅडम व स्टाफ तसेच दोन शासकीय पंच असे माझे घरी दि. 11/07/2025 रोजी अंदाजे 11/00 वा. आले पो. नि.ठाकरे मॅडम यांनी मला स्वतःचा,स्टाफचा व पंचाचा परीचय करुन दिला.व सांगीतले की, आपण दि. 10/07/2025 रोजी ला. प्र.वि.कार्यालय अमरावती येथे लेखी तक्रार दिली होती त्या अनुशंगाने कार्यवाही करावी याबाबत आमचे वरीष्ठांनी आम्हाला आदेशित केले आहे त्यावरुन आम्ही तुमच्या घरी आलो आहे. त्यावरुन मी पो.नि.ठाकरे मॅडम व स्टाफला

मी घराच्या आतमध्ये बोलाविले व घराला लागुन असलेल्या माझे कार्यालयात बसण्यास सांगीतले. मी सर्व टिमला माझा स्वतःचा परीचय करुन दिला व मी दिलेली तक्रार तोंडी सुदधा सांगीतली पो.नि.ठाकरे मॅडम यांनी सोबत आणलेल्या दोन शासकीय पंचापैकी पंच क्र. 1 म्हणुन श्री पराग दत्तात्रय सोनुने पद वरीष्ठ सहायक जि.प. बांधकाम विभाग अमरावती व पंच क्रमांक 2 श्री.लिखित वसंतराव पांडव पद- स्थापत्य अभियंता जि. प. बांधकाम विभाग अमरावती असे राहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर मी सांगितलेली तोंडी व लेखी तक्रार एकच असल्याची पंचांनी खात्री करुन पंचानी त्यावर सहया केल्या. त्यांनतर पो.नि.ठाकरे यांनी श्री.पराग दत्तात्रय सोनुने पंच क्र 2 श्री.लिखित वसंतराव पांडव यांचे समक्ष पडताळणी पुर्व पंचनामा करुन मला व पंचाना आवश्यक त्या सुचना दिल्या.तसेच व्हॉईस रेकॉर्डर व मेमरीकार्ड बाबत माहीती देवुन "मला श्री. चंद्रशेखर गोळे यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे "याबाबत पडताळणी कार्यवाही तात्काळ करणे आहे असे सांगीतले.व करण्यात आलेल्या पडताळणी पंचनामा क्र.1 दरम्यान श्री.गोळे यांना भेटलो तर त्यांनी मला सांगीतले की, उपअधिक्षक साहेब यांची सासु वारली आहे. त्यामुळे ते आज नाहीत.ते सौमवारी दि.14/07/2025 रोजी कार्यालयात येवु शकतात. त्यावरुन दि. 14/07/2025 रोजी पुन्हा पडताळणी कार्यवाही करण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले.ठरविल्याप्रमाणे दि. 14/07/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही क्र.2 दरम्यान, उपअधिक्षक साहेब कार्यालयात नसल्याने तुमची रेग्युलर सुनावणीची तारीख 18/07/2025 रोजी राहील व येतांना आपण संपुर्ण कागदपत्रासहीत माहीतीची नोट घेवुन याल असे श्री.गोळे यांनी सांगीतले वरुन पुन्हा दि.18/07/2025 रोजी पडताळणी कार्यवाही करण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. ठरविल्याप्रमाणे दि.18/07/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही क्र.3 दरम्यान सुदधा उपअधिक्षक साहेब हे सुटटीवर आहेत असे श्री.गोळे यांनी मला सांगीतले. ज्यावेळी उपअधिक्षक कार्यालयात हजर असतील किंवा श्री.गोळे हे मला फोन करतील त्यावेळी पडताळणी कार्यवाही करण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यानंतर मी दि. 22/07/2025 रोजी श्री. गोळे यांना फोनव्दारे विचारपुस केली असता त्यांनी मला सांगीतले की, मी व उपअधिक्षक साहेब असे दिनांक 30/07/2025 रोजी दुपारी 3/00 वा.मोका पाहणी करण्या करीता तुमच्या घरी येवु ही माहीती मी फोनव्दारे पो.नि. ठाकरे मॅडम यांना दिली त्यावरुन त्यांनी मला सांगीतले की, दिनांक 30/07/2025 रोजी पडताळणी कार्यवाही करण्यात येईल. ठरविल्याप्रमाणे दिनांक 30/07/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही क्र.4 दरम्यान श्री.गोळे व उपअधिक्षक श्री.नेमाडे साहेब एका चारचाकी वाहनाने माझे घरासमोर आले त्यांना मला माझे मुलाचे घर दाखविण्यास सांगीतले तर सदर घर हे आमच्या घराला लागुनच असल्यामुळे आम्ही सर्व मी, पंच क्र.1,श्री.गोळे, उपअधिक्षक श्री.नेमाडे असे पायीच माझे मुलाचे घराची पाहणी करायला गेलो घराची पाहणी केल्यानंतर आम्ही सर्वजण माझे घरात असलेल्या कार्यालयाच्या रुम मध्ये आलो. तेथे उपअधिक्षक श्री.नेमाडे यांच्या सांगीतल्याप्रमाणे श्री. गोळे यांनी माझे मुलाच्या घराचा मोका पाहणी पंचनामा केला त्यावर मी सही केली. त्यानंतर मी श्री. गोळे यांना विचारणा केली की, आता माझे मुलाचे नावाने फेरफार कधी होईल त्यावर श्री. गोळे यांनी हाताचा इशारा करुन लाच रक्कमेची मागणी केली. त्यावर मी. श्री. गोळे यांना म्हटले की स्पष्ट सांगा त्यावर श्री. नेमाडे यांनी म्हटले की,तुम्हीच ठरवा श्री.गोळे यांनी सांगीतले की,"50" त्यावर पुन्हा मी त्यांना विचारले 50 म्हणजे काय, 50 हजार काय?त्यावर श्री.गोळे यांनी हो असे म्हटले. त्यावर मी त्यांना म्हटले की ठिक आहे,माझे जवळ 20 हजार रुपयेच आहे मी बाकी पैशाची व्यवस्था थोडयावेळात करतो असे म्हणुन मी माझा दुसरा मुलगा ऋशिकेश याला आवाज दिला व म्हटले की, लड्डा काकांकडुन 30 हजार घेवुन ये माझा मुलगा बराचवेळ परत आला नाही म्हणुन मी त्याला फोन केला परंतु त्याने कॉल रिसीव्ह केला नाही त्यानंतर मी पाणी पिण्याकरीता घराच्या आत गेलो मी पाणी पिवुन माझे घरातील कार्यालयात परत आलो असता श्री.गोळे व श्री.नेमाडे सर हे कार्यालयातुन निघुन गेले होते. त्यानंतर मी श्री.गोळे यांना बरेचवेळा कॉल केला परंतु त्यांनी कॉल रिसीव्ह केला नाही.त्यानंतर रात्री श्री.गोळे यांचा मला फोन आला व त्यांनी मला पैसे घेवुन दिनांक 31/07/2025 रोजी येण्यास सांगीतले वरुन दिनांक 31/07/2025 रोजी करण्यात येणा-या सापळा कार्यवाही दरम्यान मी अंदाजे 13.57 निघालो भुमीअभिलेख कार्यालयात जावुन श्री.गोळे यांना फोन केला.त्यांनी मला ऑफीसच्या आतमध्ये येण्याबाबत सांगीतले त्यावरुन मी व पंच क्र.1 असे श्री.गोळे यांची भेट घेण्यासाठी गेलो सापळा पथक हे आमच्यावर लक्ष ठेवुनच होते मी गोळे यांना म्हटले की,"मी 50,000/- रु आणले आहे"त्यावर ते म्हणाले की,"दया" त्यावरुन मी त्यांना सदर रक्कम दिली त्यांनी माझे समक्ष सदर रक्कम त्याच्या टेबलच्या ड्राव्हरमध्ये ठेवली मी त्यांच्याशी चर्चा करतांनाच लाच रक्कम स्विकारल्याबाबतचा नियोजित इशारा ( हात वर करण्याचा) दिला.त्यावरुन सापळा पथकातील पो.नि.ठाकरे मॅडम व स्टाफ तेथे आला व पो.शि. आशिश जांभोळे यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ अंदाजे 14.08 वा.ची होती पो.नि.ठाकरे मॅडम व स्टाफ यांनी श्री.चंद्रशेखर गोळे नगर परीक्षण भुमापक क्र.3,उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय अमरावती यांना आपला परीचय देवुन त्यांना ताब्यात घेतले.व पंच क्र 1 यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी

सांगीतले की, माझे समक्ष श्री. गोळे यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाच रक्कम स्विकारली ते बसत असलेल्या ठिकाणाच्या टेबलचा ड्रॉव्हर उघडुन सदर लाच रक्कम ड्रॉव्हर मध्ये टाकली व ड्रॉव्हर बंद केला. सदर लाच रक्कम श्री.गोळे यांना ड्रॉव्हर मधुन काढुन पंच क्र.1 यांच्या ताब्यात देण्यास सांगीतले.त्यानंतर सापळा पथक हे श्री. उपअधिक्षक श्री.नेमाडे यांच्या कॅबीनमध्ये गेले तेथे पो.नि. योगीता ठाकरे यांनी आपला परीचय दिला व श्री. नेमाडे यांना आपल्या ताब्यात घेतले सदर कार्यालयात लोकांची गर्दी असल्याने व सुरक्षाच्या दृष्टीकोनाने दोन्ही लोकसेवक यांना ला.प्र.वि.कार्यालय अमरावती येथे आणण्यात आले.दोन्ही लोकसेवकास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी आपले नाव 1.अनिल पांडुरंग नेमाडे वय 55 वर्ष पद- उपअधिक्षक नेमणुक-उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय अमरावती (वर्ग-2)रा. साई मंदीराजवळ कल्पना नगर नवसारी अमरावती 2.श्री. चंद्रशेखर पुंडलिकराव गोळे वय 43 वर्ष पद- नगर परीरक्षण भुमापक क्र.3, नेमणुक-उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय अमरावती (वर्ग-3) रा.सोनल कॉलनी ,शेगाव रहाटगाव रोड ,अमरावती असे सांगीतले .सदर लाच रक्कम आलोसे क्रमांक 2 श्री.चंद्रशेखर पुंडलिकराव गोळे यांच्या कडुन जप्त करण्यात आली सदरवेळी मोबाईलव्दारे चित्रीकरण करण्यात आले.केलेल्या संपुर्ण कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. एकंदरीत दिनांक 30/07/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही क्रमांक 4 दरम्यान "माझे मुलाच्या घराचा फेरफार त्याचे नावावर करुन देण्यासाठी " श्री. चंद्रशेखर पुंडलीकराव गोळे, नगर परीरक्षण भुमापक क्र.3,यांनी उपअधिक्षक श्री.अनिल पांडुरंग नेमाडे यांच्या समक्ष मला 50,000/-रु लाचेची मागणी केली व उपअधिक्षक श्री. नेमाडे यांनी श्री.गोळे यांना लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले व दिनांक 31/07/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. चंद्रशेखर पुंडलिकराव गोळे ,नगर परीरक्षण भुमापक क्र.3 यांनी पंचासमक्ष सदर 50,000/-रु.ची लाच रक्कम स्विकारली. करीता 1.अनिल पांडुरंग नेमाडे वय 55 वर्ष पद- उपअधिक्षक नेमणुक-उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय अमरावती(वर्ग-2) रा.नवसारी साई मंदीराजवळ कल्पना.नगर अमरावती व 2.श्री. चंद्रशेखर पुंडलिकराव गोळे वय 43 वर्ष पद- नगर परीरक्षण भुमापक क्र.3,नेमणुक उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय अमरावती(वर्ग-3) रा.सोनल कॉलनी ,शेगाव रहाटगाव रोड ,अमरावती यांचे विरुदध कायदेशिर कार्यवाहीस्तव फिर्याद देत आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
DHANANJAY RAMESHRAO
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): DGPDRRM8801
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** ATUL GOVARDHAN \
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** 1510100040AGWM840